# कॉक्सिटच्या तीन विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक प्रदान

लातूर : दि. 26 स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे नुकत्याच पार पडलेल्या दिक्षांत समारंभामध्ये कॉक्सिटच्या तीन विद्यार्थ्यांना पद्मविभुषण मा. डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन, माजी अध्यक्ष भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) यांच्या हस्ते सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.

लातूर येथील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालय (कॉक्सिट) ची स्थापना झाल्यापासून विद्यापीठातील गुणवत्ता यादीत येण्याची परंपरा कायम ठेवत याही वर्षी महाविद्यालयाच्या 13 विद्यार्थ्यांनी गुणवत्तायादीमध्ये आपले स्थान निश्चित केले. त्यापैकी मीरा धनाजी मालिशे बी.एस्सी. बी.टी. शाखेतून प्रथम, ज्योती दिपक सुर्यवंशी बी.एस्सी. सॉफ्टवेअर इंजिनिअरींग शाखेतून प्रथम व धनश्री शिवाजी गिरी एम.एस्सी. सिस्टीम ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड नेटवर्किंग शाखेतून प्रथम येऊन सुवर्ण पदक पटकावले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चा 21 वा दिक्षांत समारंभ मंगळवार दि. 26 फेब्रुवारी 2019 रोजी पार पडला, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलपती विद्यासागर राव, राज्यपाल महाराष्ट्र राज्य, हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून पद्मविभुषण मा. डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन, माजी अध्यक्ष भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) व मा. कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांच्या उपस्थतीत हा कार्यक्रम पार पडला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. बी. एल. गायकवाड, डॉ. एन. व्ही. मोरे, प्रा. आय. एम. काझी, प्रा. एस. एस. जेवे, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी अभिनंदन केले.

**प्राचार्य**